वन आणि वन्यजीव संरक्षण काळाची गरज
दुरध्वनी क्रमांक - २६५१९५९
E-mail-dycfkop2007@gmail.com

**महाराष्ट्र शासन**

**उप वनसंरक्षक कोल्हापूर वन विभाग कोल्हापूर यांचे कार्यालय**

*वनवर्धन* इमारत, पोस्ट ऑफीस समोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर

---

जा.क्र.ब/नोसेल/२०२५-२६/ ४३५४ कोल्हापूर, दिनांक :- ३ /०२/२०२६.

प्रति,
मे.केदारनाथ मायनिंग अँड अर्थमुव्हर्स कंपनी,
मु.पो.बांदिवडे ता.पन्हाळा जि. कोल्हापूर

विषय -वनजमिन कोल्हापूर (क्षेत्र-१३.०० हेक्टर)
वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत मे.केदारनाथ मायनिंग अँड अर्थमुव्हर्स कंपनी यांनी मौ.सावर्डे बुद्रुक ता.शाहुवाडी जि.कोल्हापूर येथे लॅटेराईट खनिजाच्या उत्खनना करीता १३.०० हेक्टर संरक्षित वनजमिन वळतेकरणाबाबत.

संदर्भ -१. केंद्र शासन यांचेकडील पत्र क्र.FC-II/MH-१२२/२०१८-NGP/४८६५ दि.३०.०१.२०१९
२. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी म.रा.नागपूर यांचेकडील पत्र क्र. कक्ष-१७ /नोडल/आरएस/आयडी-१२५०४(२५)/२१४०/२०१८-१९ दि.११.०२.२०१९
३. या कार्यालयचे पत्र क्र.कक्ष-५/वनसंवर्धन/२०१८-१९/७२६९ दि.२२.०३.२०१९
४. या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-५/वनसंवर्धन/१९-२०/५६४१/०४/०१/२०२०.
५. या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-५/वनसंवर्धन/२०२१-२२/२६७९दि.१६/१२/२०२०.
६. या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-५/वनसंवर्धन/२०२१-२२/२८४७ दि.२६/१२/२०२१.
७. केंद्र शासनाकडील पत्र क्र.५-३/२०११-FC (vol-I) दि.६.१.२०२२
८. केंद्र शासनाकडील पत्र क्र.५-३/२०११-FC (vol-I) दि.१९.१.२०२२.
९. मा. प्रधान सचिव (वने), मुंबई यांची दि. १५-२-२०२४ रोजीची व्ही.सी.
१०. आपलेकडील पत्र दिनांक २०-०२-२०२४.
११. या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-५/वनसंवर्धन/२३-२४/४७६३, दि. २३-०२-२०२४.
१२. या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-५/वनसंवर्धन/२५-२६/११९४, दि. २०-०६-२०२५.
१३. आपलेकडील पत्र दिनांक २४-०९-२०२५.

विषयांकित प्रकरणी, केंद्र शासनाने उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत मे. केदारनाथ मायनिंग अँड अर्थमुव्हर्स कंपनी मु. पो. बांदिवडे, ता. पन्हाळा यांनी मौ. सावर्डे बुद्रुक, जंगल गट नं. २४८ ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर येथे लॅटेराईट खनिजाच्या उत्खनना करीता १३.०० हेक्टर संरक्षित वन जमिन वळतीकरण्याच्या प्रस्तावास १ ते ३० अटींचे अधीन राहुन तत्वत: सहमती दर्शविलेली आहे.

त्यानुसार केंद्र शासनाने तत्वत: मान्यता पत्रातील १ ते ३० अटींची पुर्तता करणेबाबत या कार्यालयाकडुन उपरोक्त संदर्भ क्र. ३ ते ५ अन्वये आपणास कळविण्यात आलेले होते, त्यानुसार आपलेकडुन कोणत्याही अटींची पुर्तता अद्याप झालेली नसलेने, सदर १ ते ३० अटीमधील खालील अटींची रक्कम भरणा करणेसाठी संदर्भ क्र. ६ अन्वये डिमांडनोट देवून parivesh.nic.in या वेबसाईटवरुन ई-चलनाव्दारे अॅड-हॉक-कॅम्पाच्या खात्यामध्ये रक्कम भरणा करुन चलन या कार्यालयास सादर करणेबाबत कळविण्यात आलेले होते, त्यानुसार आपलेकडुन वृक्षतोडीची रक्कम रु. ६७१४०/- इतक्या रक्कमेचा

धनादेश या कार्यालयास देण्यात आलेले आहे. त्या व्यतीरीक्त इतर रक्कमा व १ ते ३० अटींचा पुर्तता अहवाल अद्याप या कार्यालयास आपलेकडून सादर करण्यात आलेला नाही.

विषयांकीत प्रस्तावास २ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असलेने ऑनलाईन चलन अपलोड होत नसलेने कोणतीही कार्यवाही करता येत नसलेचे आपलेकडून नमूद करण्यात आलेले होते, त्याअनूषंगाने मा. प्रधान सचिव (वने), मुंबई यांची दि. १५-२-२०२४ रोजी व्ही.सी. झालेली असून, सदर व्ही.सी. मध्ये नवीन डिमांड नोट देणेबाबत सविस्तर चर्चा झालेने आपलेकडील संदर्भिय पत्र क्रं. १० अन्वये सुधारीत डिमांड नोटची मागणी केलेली आहे. त्यानूसार आपणांस कळविण्यात येते की, केंद्र शासनाचे पत्र दि. ६.१.२०२२ मधील Net Present Value (NPV) दर निश्चित करण्यात आलेले आहे. तसेच केंद्र शासनाकडील पत्र दि. १९.१.२०२२ अन्वये ज्या प्रस्तावास केंद्र शासनाकडुन तत्वत: मान्यता (Stage-I) प्राप्त झालेली आहे. त्याप्रमाणे तत्वत: मान्यता पत्रातील अटींची पुर्तता अद्याप प्रकल्प यंत्रणेकडुन झालेली नाही. त्या प्रस्तावाची पर्यायी वनीकरणाची रक्कम ही सन २०२५-२६ चे दराप्रमाणे भरणा करणे आवश्यक असलेबाबत संदर्भिय पत्र क्रं. ११ व १२ अन्वये कळविण्यात आलेले होते. परंतू आज अखेर आपण काहीही रक्कम अथवा अहवाल सादर केलेला नाही. परंतू आपण संदर्भिय पत्रान्वये पर्यायी वनीकरणासाठी जागा नंतर देणार असलेने पर्यायी जागा दिले नंतर पर्यायी वनीकरणची रक्कमची सुधारीत डिमांड नोट देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तरी खालील तपशिलाप्रमाणे **सुधारित दराने डिमांड नोट** देण्यात येत असून त्यानुसार सदर रक्कम parvesh.nic.in या वेबसाईटवरुन चलन अपडेट करुन चलनाची प्रिंट काढुन बँकेत आरटीजीएसव्दारे Ad-hoc CAMPA मध्ये भरणा केलेले चलन या कार्यालयास सादर करण्यात यावे.

| **अट क्रं.** | **बाब** | **एकुण भरावयाची रक्कम (रुपयात)** | **भरणा केलेली रक्कम(रुपयात)** | **भरणा करावयाची प्रलंबित रक्कम (रुपयात)** |
|---|---|---|---|---|
| vi | पर्यायी दिलेले जमिनीवर सर्वे डिमार्केशन व RCC पिलर्स उभारणे | ३९९१००.०० | ०.०० | ३९९१००.०० |
| vii | वर्तमान नक्त मुल्य (NPV) (१३ हे x ९५७७८०/-=१२४५११४०/-) | १२४५११४०.०० | ०.०० | १२४५११४०.०० |
| xxiv | कृत्रिम घरटे बसविणे ( १०१० घरटे x रु. ४०० प्रमाणे) | ४०४०००.०० | ०.०० | ४०४०००.०० |
| xxiii | २०२ वृक्षतोडीची **रक्कम** | ६७१४०.०० | ६७१४०.०० | ०.०० |
| | **एकुण एकंदर** | **१३३२१३८०.००** | **६७१४०.००** | **१३२५४२४०.००** |

वरील प्रमाणे रक्कमेचे चलन भरणा करुन या कार्यालयास सादर करण्यात यावे. तसेच निकृष्ठ जमीनीवर वनीकरण, इतरत्र निवडण्यासाठी, सुरक्षा क्षेत्राखालील दिडपट जागेबाबत तसेच अट क्रं. १७ बाबत या कार्यालयास कळविण्यात यावे, केंद्र शासनाचे प्रथम मान्यता पत्रातील १ ते ३० अटींची परिपुर्ण पुर्तता करुन पुर्तता अहवाल, हमीपत्र व आवश्यक दस्ताऐवजासह (इंग्रजी भाषेत) पाच प्रतीत या कार्यालयास सादर करण्यात यावे.

(धैर्यशील पाटील)
उपवनसंरक्षक,
कोल्हापूर वनविभाग कोल्हापूर

प्रतिलिपी- मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर यांना माहितीसाठी सविनय सादर.